
दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रु. ४.०० I अंक २४२ I सोमवार १५ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

# श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील जप्त गुटखा गायब?

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : अवैध गुटखा आणि सुगंधी तंबाखूविरोधात कारवाया करणाऱ्या यंत्रणेलाच आता स्वतःच्या जप्त मुद्देमालाच्या सुरक्षेबाबत प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. गुन्हा क्रमांक ०४६३/२०२६ मध्ये तब्बल २६ लाख ४० हजार २९६ रुपयांचा गुटखा, पानमसाला, सुगंधी तंबाखू आणि वाहने जप्त करण्यात आली होती. मात्र या मुद्देमालाचा संरक्षकच भक्षक बनल्याने खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत लाखो रुपयांचा गुटखा श्रीगोंदयात जप्त करण्यात आला पण गुटखा सापडला आणि पोलिसांच्या चोरीचे बिंग फुटले नूतन पोलिस अधीक्षक यांच्या आदेशानुसार प्रत्येक पोलीस निरीक्षक दुसऱ्याच्या हद्दीत जाऊन कारवाया केल्या त्यानुसार बेलवंडी पोलिसांनी श्रीगोंदयात कारवाई केली आणि २६ लाख ४० हजार २९६ रुपयांचा गुटखा, पानमसाला, सुगंधी तंबाखू आणि वाहने जप्त करण्यात आली तो मुद्देमाल गुन्ह्यासह मुद्देमाल श्रीगोंदा पोलिसांच्या स्वाधीन केला त्यानंतर या गुन्ह्यांचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिरे याच्याकडे देण्यात आला त्यानंतर काही दिवसांनी अहिल्यानगर गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने श्रीगोंद्यात कारवाई केली आणि पकडलेल्या मुद्देमालाच्या

**मुद्देमालाच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह**

पडताळणीत काही जप्त पोत्यांवरील गुन्हे क्रमांक आढळून आला आणि मग चर्चेला उधाण आले पुढे गुन्हे अन्वेषण शाखेचे पथकातील पोलीस थोडे खोलवर गेले असता हा मुद्देमाल श्रीगोंदा पोलिसांनीच विकल्याचे त्यांच्या निदर्शनात आले त्यावरून त्यांनी वरिष्ठ कार्यालयात याबाबत माहिती दिली आहे

यामुळे जप्त केलेला सर्व **(पान ४ वर)**

# कौशल्य प्रशिक्षण उपक्रमाचे दीपस्तंभ
# ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी मिळाली तर ते जग जिंकू शकतात, या विचारावर विश्वास ठेवून शिक्षण, कौशल्य विकास, उद्योजकता आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधणारे महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा घेतलेला हा मागोवा केवळ गौरवाचा विषय नसून ग्रामीण भागासाठी प्रेरणेचा स्रोत आहे.

**– करण नवले, संपादक**

**ग्रामीण शिक्षणाला आधुनिकतेची जोड**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी दिली. या शिक्षण चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देण्याचे काम डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक शिक्षण संस्था, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, नर्सिंग, व्यवस्थापन आणि तंत्रशिक्षणाच्या विविध शाखा विकसित करण्यात आल्या.



आज हजारो विद्यार्थी ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन देश-विदेशात विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. शिक्षण केवळ पदवी मिळविण्यापुरते मर्यादित न राहता व्यक्तिमत्त्व विकासाचे माध्यम बनावे, यासाठी संस्थेमध्ये विविध उपक्रम राबविले जातात.

स्पर्धा परीक्षा केंद्रातून घडत आहेत अधिकारी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही योग्य मार्गदर्शनाचा अभाव असतो. ही गरज ओळखून प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्राची उभारणी करण्यात आली. या केंद्रातून अनेक विद्यार्थी पोलीस विभाग, सैन्यदल, महसूल विभाग, बँकिंग क्षेत्र तसेच विविध शासकीय सेवांमध्ये निवडले गेले आहेत.ग्रामीण युवकांना स्पर्धा परीक्षांची भीती वाटू नये, त्यांना योग्य मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि अनुभवी शिक्षकांचे सहकार्य मिळावे, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. परिणामी अनेक कुटुंबांमध्ये सरकारी सेवेची परंपरा निर्माण होत आहे.



**संस्कार आणि परंपरांचे संवर्धन**

आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि सामाजिक मूल्यांचे जतन होणे तितकेच आवश्यक आहे. याच विचारातून प्रवरा परिवारात आषाढवारी सारखा उपक्रम राबविला जातो. विद्यार्थ्यांना संत परंपरा, वारकरी संप्रदाय, समाजसेवा, सामूहिकता आणि नैतिक मूल्यांची ओळख करून दिली जाते. आजच्या तंत्रज्ञानप्रधान **(पान ४ वर)**

## भाविकांचा टेम्पो विहिरीत कोसळला
## पंढरपुरात भीषण अपघातात १४ जणांचा मृत्यू

पंढरपूर : सोलापूरच्या म्हसवड-पंढरपूर मार्गावर तांदूळवाडी गावाजवळ टेम्पो विहिरीत कोसळून भीषण अपघात झाला आहे. या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला आहे. अपघातामधील सर्व मृत भाविक पंढरपूरच्या रांजणी गावचे आहेत. या भीषण अपघातानंतर संपूर्ण पंढरपुरात खळबळ उडाली आहे. मि ळालेल्या माहितीनुसार, म्हसवड-पंढरपूर मार्गावरून सिद्धनाथांच्या दर्शनासाठी गेलेल्या भाविकांवर काळाने घाला घातला. सिद्धनाथांचं दर्शन करून गावाकडे परताना माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी गावानजीक एका विहिरीत टेम्पो कोसळला. टेम्पो कोसळून भीषण अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांम ध्ये पुरुषांसहित महिला, लहान मुलांचा देखील समावेश आहे. अपघात झाल्यानंतर घटनास्थळी नागरिकांची एकच गर्दी झाली. तांदूळवाडीमधील ग्रामस्थ तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर त्यांनी मदतीला सुरुवात केली. गावकरी पोलीस आणि प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी विहिरीतील मृतदेह बाहेर काढले. त्यानंतर मृतदेह तातडीने रुग्णालयात पाठवण्यात आले. अपघातातील मृतांची नावे अद्याप हाती आलेली नाहीत.

## महत्त्वाचे..

### आ. रोहित पवारांच्या आंदोलनाची सरकारकडून दखल
**गिरीश महाजन भेटीला जाणार?**

पंढरपूर : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आम दार यांनी शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी सुरू केलेल्या आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. कर्जमाफीवरील विविध अटी व शर्ती रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. सततच्या आंदोलनामुळे रोहित पवार यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली असून, त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तसेच कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यभरातील विविध शेतकरी संघटना, सामाजिक संस्था आणि विरोधी पक्षांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. त्यामुळे सरकार या प्रश्नावर कोणती भूमिका घेणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, मुख्यमंत्री यांनी या आंदोलनाची दखल घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.














# शाळा प्रवेशोत्सव : शिक्षणाच्या नव्या आशेचा उत्सव




महाराष्ट्रात १५ जून २०२६ रोजी 'शाळा प्रवेशोत्सव' साजरा होत आहे. विदर्भातील शाळा वगळता राज्यातील बहुतांश भागात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात या उत्सवाच्या माध्यमातून होणार आहे. शिक्षण विभागाचा हा उपक्रम केवळ शाळेचा पहिला दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून प्रत्येक बालकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांवरील पालकांचा विश्वास दृढ करण्याचा आ शिक्षणाबाबत सकारात्मक सामाजि वातावरण निर्माण करण्याचा व्याप प्रयत्न आहे.

कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा पाया शिक्षणात असतो. शिक्षण हे केवळ अक्षरओळख करून देणारे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जाणीव, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी माध्यम आहे. म्हणूनच भारतीय राज्यघटनेने शिक्षणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्य शिक्षणाचा अधिकार अधिनियम प्रत्ये मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याची हमी देतो. मात्र आजही अनेक भागांमध्ये शिक्षणाबाबत उदासीनता, आर्थिक अडचणी, स्थलांतरित मजूर कुटुंबे आणि खाजगी शाळांकडे वाढता कल या कारणांमुळे शासकीय शाळांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत शाळा प्रवेशोत्सवासारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो. विशेषतः इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांसाठी हा दिवस नव्या जगात टाकलेले पहिले पाऊल असते. अनेक मुलांच्या मनात भीती, संकोच किंवा उत्सुकता असते. अशावेळी शाळेत प्रवेश करताना त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करणे, आनंददायी वातावरण निर्माण करणे, 'पहिले पाऊल' उपक्रमांतर्गत पायाचा ठसा जतन करणे अशा उपक्रमांमुळे मुलांच्या मनात शाळेविषयी आत्मीयता निर्माण होते. शिक्षणाचा प्रवास आनंददायी बनविण्याची ही प्रभावी सुरुवात आहे.

मागील काही वर्षांत शासकीय शाळांमधील पटसंख्या घटण्याची समस्या राज्यासह देशभरात प्रकर्षाने जाणवत होती. खाजगी शाळांची वाढ, इंग्रजी माध्यमाविषयी पालकांचे आकर्षण आणि ग्रामीण भागातील लोकसंख्येतील बदल यामुळे अनेक शाळांतील विद्यार्थी संख्या कमी झाली. याचा परिणाम शाळांच्या अस्तित्वावरही होऊ लागला. मात्र मागील वर्षी राबविण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सवामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पटसंख्येत वाढ झाल्याचे दिसून आले. हा बदल केवळ आकडेवारीपुरता मर्यादित नसून समाजाचा शासकीय शिक्षण व्यवस्थेवरील वाढता विश्वास दर्शविणारा आहे.

शिक्षण विभागाने यंदा या उपक्रमाला अधिक व्यापक स्वरूप दिले आहे. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी स्वतः शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. यामुळे शिक्षण हा केवळ विभागीय विषय नसून शासनाच्या सर्वोच्च प्राधान्यक्रमातील विषय आहे, हा संदेश समाजापर्यंत पोहोचतो. लोकप्रतिनिधी ाणि अधिकाऱ्यांचा थेट सहभाग शाळा वस्थापनाला नवी ऊर्जा देणारा ठरू कतो.

विशेषतः 'दत्तक शाळा' ी संकल्पना अत्यंत दूरदृष्टीची आहे. एखाद्या अधिकाऱ्याने किंवा लोकप्रतिनिधीने वर्षभर एका शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला, तेथील भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि शैक्षणिक परिणाम याकडे लक्ष दिले तर त्या शाळेच्या विकासाला निश्चितच लना मिळेल. अनेकदा शासकीय जनांची प्रभावी अंमलबजावणी केवळ यमित पाठपुराव्याअभावी होत नाही. दत्तक शाळा उपक्रमामुळे ही उणीव भरून निघण्याची शक्यता आहे.

तथापि, शाळा प्रवेशोत्सवाचा खरा यशस्वी परिणाम केवळ एका दिवसाच्या कार्यक्रमातून साध्य होणार नाही. विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, फुले देणे किंवा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे ही सुरुवात असली तरी त्यानंतरच्या ३६५ दिवसांत शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचावणे अधिक महत्त्वाचे आहे. पालकांचा विश्वास जिंकण्यासाठी गुणवत्तापूर्ण अध्यापन, प्रशिक्षित शिक्षक, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्वच्छ व सुरक्षित शाळा परिसर, खेळ व कला शिक्षणाच्या सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित वातावरण आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन शिक्षण, स्मार्ट क्लासरूम आणि कौशल्याधारित शिक्षण यांचा प्रभाव वाढत आहे. ग्रामीण व शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांनाही या संधी समान प्रमाणात उपलब्ध होणे आवश्यक आहे. अन्यथा शिक्षणातील विषमता वाढण्याचा धोका आहे. शाळा प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याबरोबरच त्यांना गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण देण्याचे उद्दिष्टही साध्य केले पाहिजे.

या उपक्रमात पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मुलांचे शिक्षण ही केवळ शिक्षक किंवा शासनाची जबाबदारी नसून कुटुंब आणि समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. पालकांनी शाळेशी सातत्याने संपर्क ठेवणे, मुलांच्या शिक्षणात सहभाग घेणे आणि शाळेच्या उपक्रमांना सहकार्य करणे आवश्यक आहे. समाजातील विविध संस्था, स्वयंसेवी संघटना आणि माजी विद्यार्थी यांनाही शाळांच्या विकासासाठी पुढे येण्याची गरज आहे.

शाळा प्रवेशोत्सव हा प्रत्यक्षात शिक्षणाच्या नव्या आशेचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या संकल्पनेचा उत्सव आहे. प्रत्येक बालक शाळेत आले, प्रत्येक वर्ग भरला, प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले आणि प्रत्येक पालकाचा शासकीय शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास दृढ झाला तरच या उपक्रमाचे खरे यश मानता येईल. शाळेच्या पहिल्या दिवशी उमलणारे हे हास्य वर्षभर टिकून राहावे आणि त्यातून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी व्हावी, हीच अपेक्षा..!

# श्रीकांत दोंदे हत्याप्रकरणी न्यायासाठी ठिय्या आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठातील सुरक्षा रक्षक श्रीकांत पोपट दोंदे यांच्या हत्येप्रकरणी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, पीडित कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी आणि कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्यात यावी, या मागण्यांसाठी शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

आंदोलनकर्त्यांनी विद्यापीठ प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर आरोप केले. दोंदे कार्यरत असलेल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे, पुरेशी प्रकाशयोजना आणि आवश्यक सुरक्षा साहित्य नसल्याने ही घटना घडल्याचा दावा करण्यात आला. संबंधित सुरक्षा अधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांची सीआयडीमार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली.

**महामार्ग रोकोचा इशारा**

आंदोलनाची दखल घेत विद्यापीठ प्रशासनाने दोंदे कुटुंबाला मिळणाऱ्या विमा रकमेसाठी आवश्यक कागदपत्रे प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.मात्र, येत्या आठ दिवसांत मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास २३ जून रोजी नगर-मनमाड महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांनी दिला. त्यामुळे या प्रकरणाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

आंदोलनादरम्यान दोंदे यांच्या हत्येची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच या प्रकरणाचा तपास स्वतंत्र आणि निष्पक्ष यंत्रणेकडे सोपवावा, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.



# अखंड हरिनामन सप्ताहाचे रुपांतर चांगल्या पावसात होवू दे : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** ''अलनिनोचे संकट घालव अन् भरपूर पाऊस पडू दे''आशी प्रार्थना विश्व गौरव प.पू.गगनगिरी महाराज यांच्या चरणी आहे.लाखो भाविकां च्या उपस्थितीमध्ये संपन्न होणाऱ्या

अखंड हरिनामन सप्ताहाचे रुपांतर चांगल्या पावसात होवू दे अशी प्रार्थना जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांनी केली. संगमनेर तालुक्यात गुंजाळवाडी येथे पं.पू.स्वामी गगनगिरी महाराज भक्त परिवाराचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास मंत्री विखे, आ. अमोल खताळ व नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी भेट देत महाआरती केली. यावेळी विदर्भ रत्न रामायणाचार्य रामराव महाराज



ढोक यांनी मंत्री विखे पाटील यांचे जन्मदिनानिमित्त न अभिष्टचिंतन केले.

मंत्री डॉ विखे पाटील म्हणाले की मागील वर्षी मे महीन्यात पाऊस सुरू झाला होता.यंदा जून महीना संपत आला तरी पाऊस आला नाही. अल निनोचे मोठे संकट यावर्षी निर्माण झाले असल्यामुळे पाऊस फारच कमी पडणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे धरणातील पाणी साठे आरक्षित करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. सिंचनाचे सर्व आवर्तन थांबविण्यात आले असून राज्यातील सर्वच धरणांमधील पाणी ३१ ऑगस्टपर्यंत राखून ठेवण्यात येणार असल्याचे ना. राधाकृष्ण विखे यांनी यावेळी सांगितले.

अधिक मासानिमिताने आयोजित केलेल्या सप्ताहाची परंपरा कायम ठेवल्याबद्दल गगनगिरी महाराज भक्तपरिवाराचे अभिनंदन केले. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे आणि आ. अमोल खताळ यांचा सप्ताह कमिटीच्या वतीने अध्यक्ष दिलीप शिंदे आणि आयोजक आबासाहेब थोरात यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# साई संस्थानच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शेजवळ यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साई बाबा संस्थान च्या गेल्या ४० वर्षांपासून मदतनीस ते सुरक्षा निरीक्षक पदापर्यंत मजल घेत प्रामाणिक सेवा केल्याबद्दल शिर्डीचे भूमिपूत्र कैलास कुशाबा शेजवळ यांचा कोपरगाव करांच्या वतीने नुकताच सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या प्रगतीसाठी संपूर्ण आयुष्य प्रामाणिकपणे वाहून घेतलेल्या अधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणे, त्याच्या योगदानाची दखल घेऊन सन्मान करणे म्हणजे त्याने केलेल्या कार्याची पावतीच देण्यासारखे आहे, असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाच्या आठवले गटाचे राज्य सचिव दीपक गायकवाड यांनी केले. कोपरगाव येथील ओम साई ग्रामीण शिक्षण संस्थेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संस्थेचे संस्थापकअध्यक्ष डॉ. परशराम साबळे, भाजप प्रदेश सदस्य नानासाहेब शिंदे, यादवराव त्रिभुवन, मुन्ना शेख, विजय शिंगाडे, प्रा. विशाल धारणगावकर, प्रा. जनार्दन सुपेकर, निलेश देवकर, मुन्ना पठाण, आबा गायकवाड आदी उपस्थित होते.



कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी कैलास शेजवळ यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. परशराम साबळे म्हणाले, की आजही समाजव्यवस्था

प्रामाणिकपणा आणि सचोटीच्या आधारावरच टिकून आहे. सेवाकाळात प्रामाणिकपणे केलेले काम व्यक्तीचे नाव उज्वल करत असते. कैलास शेजवळ यांनी आपल्या सेवाकाळात अशीच निष्ठावान कामगिरी केली आहे. आता उर्वरित आयुष्य त्यांनी स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी देत निरोगी व आनंदी जीवन जगावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.यावेळी कैलास शेजवळ यांच्या दीर्घ व उल्लेखनीय सेवाकार्याचा गौरव करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.

# शेळके वस्तीवर बिबट्याचा कुत्र्यावर हल्ल्याचा प्रयत्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा:** नेवासा तालुक्यातील चांदा शिवारातील शेळके वस्तीवर दिवसाढवळ्या बिबट्याने कुत्र्याच्या शिकारीचा प्रयत्न केला पण वस्तीवरी नागरीकांच्या सतर्कतेमुळे कुत्र्याचे प्राण वाचले याबाबत सविस्तर वृत्त असे की चांदा शिवारातील चांदा हिवरा रोड लगत गट नंबर २७३ मध्ये वस्तीवर राहणारे

ज्ञानदेव गोरक्षनाथ शेळके ( माऊली ) यांच्या कुत्र्याची दिवसाढवळ्या पाच वाजेच्या दरम्यान बिबट्याने शिकार केली व कुत्र्याला आपल्या जबड्यात धरले परंतु ज्ञानदेव शेळके व त्यांच्या पत्नीने व वस्तीवर इतर नागरिकांनी आरडा ओरड करून त्या बिबट्याला पिटाळून लावले व कुत्र्याला त्याच्या तावडीतून सोडवले म्हणून त्या कुत्र्याचे प्राण वाचले पण कुत्र्याला बिबट्या चे दात व नख्या लागल्याने ते जखमी परंतु या घटनेने वस्तीवरील लोक परिसरातील नागरिकांत चांगलेच भीतीचे वातावरण पसरले आहे हा बिबट्या बऱ्याच दिवसापासून याच परिसरात वावरतो त्याला लवकरात लवकर वण विभागाने जेरबंद करावे अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे

मागील आठवड्यात आदिनाथ वामन यांच्या शेळीची शिकार देखील बिबट्याने केली होती

बरेच दिवसापासून चांदा परिसरामध्ये पिंजऱ्याची मागणी आहे परंतु पिंजरा काही मिळेना आणि बिबट्या काही जेरबंद होईना लवकरात लवकर या बिबट्याला जेरबंद करावे व आम्हाला भयमुक्त करावे अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# लॉन्ड्रीच्या कपड्यात आलेले पैसे प्रामाणिकपणे परत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** प्रामाणिकपणा आणि माणुसकी आजही जिवंत असल्याचा प्रत्यय नेवासा येथे आला. कपड्याच्या खिशात विसरलेले ४,७४० रुपये संबंधित ग्राहकाला सुरक्षित परत करून लॉन्ड्री चालक शिवाभाऊ राजगिरे यांनी इमानदारीचा आदर्श घालून दिला आहे.

नेवासा येथील गौरव बेहळे यांनी नेहमीप्रमाणे इस्त्रीसाठी आपले कपडे 'शिव लॉन्ड्री'मध्ये दिले होते. कपडे इस्त्री करत असताना शिवाभाऊ राजगिरे यांना एका शर्टच्या खिशात नोटांची घडी आढळली. खिसा तपासला असता त्यामध्ये तब्बल ४,७४० रुपये असल्याचे दिसून आले.

पैसे स्वतःकडे न ठेवता शिवाभाऊ यांनी तत्काळ गौरव बेहळे यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधला. तुमच्या कपड्याच्या खिशात पैसे राहिले आहेत, ते सुरक्षित आहेत, असे सांगून त्यांनी बेहळे यांना लॉन्ड्रीवर बोलावले. त्यानंतर संपूर्ण रक्कम आदरपूर्वक त्यांच्या स्वाधीन करण्यात आली.

आपले विसरलेले पैसे परत मिळाल्याने गौरव बेहळे यांनी समाधान व्यक्त करत शिवाभाऊ राजगिरे यांचे आभार मानले. ग्राहकांप्रती असलेली निष्ठा आणि प्रामाणिकपणाची भावना जपणाऱ्या शिवाभाऊ राजगिरे यांच्या या कृतीचे नेवासा परिसरातून सर्वत्र कौतुक होत आहे.



# ॲड. रावसाहेब शिंदे जीवनगौरव पुरस्कार सर्वश्रेष्ठ : डॉ. ज्ञानदेव म्हस्के

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूरमध्ये असताना ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या छत्रछायेखाली आणि श्रीरामपूरकरांच्या स्नेहभाव आणि सौख्यातून जीवन सुसंस्कारित झाले. श्रीरामपूरातील महादेव मळा या तीर्थस्थानी ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या नावाचा हा पुरस्कार माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ पुरस्कार आहे, असे मत सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी केले. श्रीरामपूर येथील महादेव मळ्यात विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानच्यावतीने नुकताच राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रयत शिक्षण संस्थेचे व्हॉ. चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे हे होते तर अध्यक्ष रयतचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील हे होते. यावेळी व्यासपीठावर कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, माजी प्राचार्य टी.ई.शेळके, माजी प्राचार्य डॉ. एकनाथराव ढोणे, डॉ. राजीव शिंदे, डॉ. बाबुराव उपाध्ये, संस्थापक सचिव सुखदेव सुकळे हे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते ॲड. रावसाहेब शिंदे व ज्ञानतपस्वी डॉ. रत्नाकर मंचरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून मंगलताई आढाव, डॉ. प्रेरणा शिंदे आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सुखदेव सुकळे यांनी केले. यावेळी विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानच्यावतीने प्रमुख पाहुण्यांच्या सन्मानासह कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांचा स्व. ॲड. रावसाहेब शिंदे राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ तर माजी प्राचार्य डॉ. एकनाथराव ढोणे यांचा ज्ञानतपस्वी डॉ. रत्नाकर मंचरकर राज्यस्तरीय शिक्षणरत्न साहित्य पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. तर कवयित्री डॉ. संगीता फासाटे (कटारे) यांचा पीएच.डी प्राप्तीबद्दल सन्मान करण्यात आला. याप्रसंगी ॲड.भगीरथ शिंदे, डॉ. एकनाथ ढोणे, डॉ. राजीव शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी दुर्गाताई तांबे, डॉ. शंकरराव गागरे, डॉ. दीनानाथ पाटील, काशिनाथ गोराणे, प्रकाश निकम, उद्धव टेमकर, पद्माकर शिंपी, ॲड. भागचंद चुडीवाल, डॉ. दिलीप पडघन आदी उपस्थित होते.




# पती-पत्नीला लाकडी दांड्याने मारहाण, गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

तूमच्याकडे पाहतो, असे म्हणून आरोपींनी दोघा पती पत्नीला शिवीगाळ दमदाटी करुन लाकडी बॅट व लोखंडी पाईपने मारहाण केल्याची घटना राहुरी शहर हद्दीतील बारागांव नांदुर रोड परिसरात घडली.अन्वर भिकन शेख, वय २८ वर्षे, रा. बारागांव नांदुर रोड, राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, अन्वर शेख हे राहत असलेल्या वस्तीवर त्यांच्या मामाचा मुलगा हबीब चाँद पठाण हा त्याच्या कुटुंबासह राहत आहे. दि. ११ जून २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास अकबर चाँद पठाण हा अन्वर शेख यांच्या घरी येवुन गप्पा मारत बसलेला होता. तेव्हा घराच्या समोर हबीब चाँद पठाण हा दारु पिवुन आला. त्याने अकबरला पाहुन घराच्या दिशेन दगड फेकुन मारला. तेव्हा अन्वर शेख यांनी अकबर पठाणला घरातुन काढुन दिले होते. त्यानंतर रात्री ८ वाजेचे सुमारास अन्वर शेख हे आरोपी तेथे आले. आणि तुमच्याकडे पाहतो, असे म्हणुन आरोपींनी अन्वर शेख व त्यांची पत्नी रेश्मा शेख या पती पत्नीला शिविगाळ दमदाटी करून लाकडी बॅट, लोखंडी पाईप आणि लाकडी काठीने मारहाण केली. घटनेनंतर अन्वर भिकन शेख यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी हबीब चाँद पठाण, अस्मल हबीब पठाण, असिफ हबीब पठाण, सर्व रा. बारागांव नांदुर रोड, राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# जुन्या तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी शहरातून जाणाऱ्या नगर मनमाड महामार्गावर असलेल्या राहुलच्या जुन्या बस स्टॅन्ड परिसरात जुन्या वादातून भरदिवसा योगेश चोपडे या तरुणावर धारदार हत्याराने जीवघेणा हल्ला झाल्याने राहुरी शहरात एकच खळबळ उडाली असून शहरात भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. जुन्या वादातून झालेल्या या रक्तरंजित हल्ल्याने शहरासह तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही धक्कादायक घटना काल रविवारी दिनांक १४ जून रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास नगर मनमाड रोडवरील जुन्या बस स्थानकासमोर घडली. योगेश चोपडे उर्फ डॉन हा दुचाकीवरून राहुरी शहरातून राहुरी खुर्दच्या दिशेने जात असताना पाठीमागून आलेल्या दुचाकीस्वाराने अक्षय नामक तरुणाने अचानक हल्ला चढवला. धारदार हत्याराने केलेल्या या हल्ल्यात चोपडेच्या चेहऱ्यावर आणि पोटावर गंभीर जखमा झाल्या. जखमी अवस्थेत असलेल्या डॉनला तात्काळ स्थानिक खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यावर उपचार सुरू आहेत.

घडलेल्या या घटनेची माहिती मिळताच पोलीस कर्मचारी प्रमोद ढाकणे आणि त्वरित पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांना या घटनेची माहिती कळविली. पोलीस निरीक्षक श्री देशमुख यांनी ताबडतोब घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि त्या हल्लेखोर आरोपीला पकडण्यासाठी विशेष पोलीस पथक रवाना केले आहे. दरम्यान, झालेला हा हल्ला जुन्या वादातून झाल्याची चर्चा शहरात रंगली असून, आगामी काळात या प्रकरणामुळे आणखी मोठा संघर्ष उफाळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वीच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांची बदली होऊन रवींद्र देशमुख यांनी पदभार स्वीकारला असताना, मागील महिनाभर झालेले तीन खुन आणि गंभीर हल्ल्यात एक जखमी असे गुन्हे झाले असता काल भरदिवसा झालेल्या या थरारक हल्ल्यामुळे राहुरीत भीतीचे सावट पसरले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान राहुरीच्या पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारलेले पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी या गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

# नामदार राधाकृष्ण विखे पाटील
## वाढदिवस निमित्त हार्दिक शुभेच्छा...






















































## पान १ वरुन

### श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील जप्त गुटखा गायब?

मुद्देमाल शाबूत आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात काही वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबतही संशय व्यक्त केला जात असून, जप्त मालाच्या ताबा, नोंदी आणि साठवणुकीची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. जप्त केलेला मुद्देमाल चार्ज देताना आणि स्वीकारताना नेमकी काय प्रक्रिया पार पडली, त्याची नोंद कुठे आहे, याचीही चौकशी होणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे.दरम्यान, महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेला गुटखा व सुगंधी तंबाखू जप्त केल्यानंतर तो न्यायालयीन आदेशाशिवाय हलविणे किंवा त्यात कोणताही गैरव्यवहार होणे हा गंभीर प्रकार मानला जातो. त्यामुळे या प्रकरणात सत्य काय आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जप्त मुद्देमाल सुरक्षित आहे की त्यात गैरव्यवहार झाला आहे? संशयाच्या भोवऱ्यात नेमके कोण? वरिष्ठ पोलीस अधिकारी स्वतंत्र चौकशीचे आदेश देणार का? या प्रश्नांची उत्तरे आता चौकशीनंतरच समोर येणार आहेत. मात्र जप्त मुद्देमालाच्या सुरक्षेवर निर्माण झालेले प्रश्न श्रीगोंदा पोलीस ठाण्यासाठी डोकेदुखी ठरत आहेत. आरोपीवर गुन्हा दाखल करून एलसीबी रवाना श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अहिल्यानगर गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने पकडलेला गुटखा श्रीगोंदा पोलिसांच्या ताब्यात देऊन रवी बबन दळवी रा. श्रीगोंदा यांच्यावर गुन्हा दाखल करून मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात देऊन ते निघून गेले. बाकी गोधळ रात्री उशिरापर्यंत चालू होता.

### कौशल्य प्रशिक्षण उपक्रमाचे दीपस्तंभ : ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

युगात विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहावे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच सुसंस्कृत नागरिक घडविण्याचे कार्य घडत आहे. कौशल्याधारित शिक्षणातून रोजगारक्षम युवक राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर घडवण्याचे काम त्यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता विकसित व्हावी यासाठी विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याला त्यांचे विशेष प्राधान्य आहे. संगणक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक उद्योग व्यवस्थापन, कृषी प्रक्रिया उद्योग, आरोग्य सेवा, डिजिटल कौशल्ये, संवाद कौशल्ये अशा अनेक क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे ग्राम ीण युवक जागतिक स्पर्धेत सक्षमपणे उभे राहत आहेत. भारताला आत्मनिर्भर बनविण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाशी सुसंगत असे तंत्रशिक्षण देण्यावर विशेष भर प्रवरा शैक्षणिक संकुलात ना.विखे पाटील यांचा विशेष पुढाकार आहे. अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, आयटीआय आणि विविध तांत्रिक अभ्यासक्रमांमधून विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार प्रशिक्षण दिले जाते. यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत असून अनेक विद्यार्थी स्वतःचे उद्योग सुरू करण्यासाठी पुढे येत आहेत. शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्यासाठी संस्थेने सातत्याने प्रयत्न केले आहेत. *बिल्डिंग प्रवरा* *उद्योजकतेची* *प्रयोगशाळा* नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकरी निर्माण करणारे युवक घडविणे हा डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा दूरदृष्टीचा विचार आहे. याच संकल्पनेतून बिल्डिंग प्रवरा हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला. विद्यार्थी एक्सपोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध उत्पादनांचे, सेवांचे आणि नवकल्पनांचे स्टॉल उभारले. या स्टॉल्सच्या माध्यमातून दीड कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल झाली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष व्यवसाय नियोजन, ग्राहक व्यवस्थापन, विपणन, वित्तीय नियोजन आणि नेतृत्वाचे धडे अनुभवातून शिकले. हा उपक्रम ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची मानसिकता निर्माण करणारा ठरला आहे. *प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थ्यांचे बळ* प्रवरा संस्थेची मजबूत प्लेसमेंट व्यवस्था आज अनेक विद्यार्थ्यांच्या यशाचा पाया ठरला. देशातील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. याशिवाय संस्थेचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असून ते नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी जागतिक स्तरावरील दारे खुली होत आहेत.

*कृषी शिक्षणाला प्रत्यक्ष कृतीची जोड*

कृषिप्रधान भागातील विद्यार्थ्यांसाठी कृषी शिक्षण हे केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित नसावे, या विचारातून प्रत्यक्ष शेतात प्रशिक्षणाची संकल्पना राबविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक शेती, जलव्यवस्थापन, पीक संरक्षण, कृषी उद्योजकता, सेंद्रिय शेती आणि कृषी तंत्रज्ञान यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. शेतकऱ्यांपर्यंत नवीन संशोधन पोहोचविण्याचे कार्यही संस्थेमार्फत सातत्याने केले जाते. बांधावर शिक्षण आणि शेतकऱ्यांच्या सेवेत संशोधन ही संकल्पना ग्रामीण विकासासाठी महत्त्वाची ठरत आहे. शिष्यवृत्तींच्या माध्यमातून शिक्षणाची संधी आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, यासाठी विविध शिष्यवृत्ती योजना, आर्थिक सहाय्य आणि फी सवलती उपलब्ध करून दिल्या जातात. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना या योजनांमुळे उच्च शिक्षणाची संधी मिळाली आहे. शिक्षण हे आर्थिक परिस्थितीवर नव्हे तर गुणवत्तेवर आधारित असावे, या तत्त्वाची जपणूक करण्यात येत आहे. विकासाच्या केंद्रस्थानी म ाणूस डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कार्याचा केंद्रबिंदू हा नेहमीच सामान्य माणूस राहिला आहे. नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा देताना, त्यांनी सुरू केलेली शिक्षण आणि विकासाची ही वाटचाल अधिक व्यापक आणि यशस्वी होवो, हीच शुभेच्छा.

# खाकीपुढे तस्करांचा 'स्मार्ट गेम' फेल!

## पोलिसांना चकवा देण्यासाठी थेट 'व्हॉट्सअॅप कॉलिंग'चा वापर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव :** चित्रपटात शोभेल अशा हायटेक स्टाईलने चालणारे गुटखा तस्करीचे मोठे रॅकेट अहमदनगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने उद्ध्वस्त केले आहे. पोलिसांचे कॉल रेकॉर्डिंग आणि लोकेशन ट्रॅकिंग टाळण्यासाठी तस्करांनी थेट 'व्हॉट्सअॅप कॉलिंग'चा सिंडिकेट सुरू केला होता. मात्र, खाकीच्या अचूक टायमिंगपुढे तस्करांचा हा 'स्मार्ट गेम' सपशेल फेल ठरला आहे. संगमनेरजवळील खंडेरायवाडी येथे रविवारी सायंकाळी सव्वासहा वाजता टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी ५५,६०० रुपयांच्या मुद्देमालासह एकाला जागेवरच बेड्या ठोकल्या. या संपूर्ण रॅकेटचा मास्टरमाईंड होता संगमनेरचा आफ्रीदी पठाण. 'आपला फोन ट्रॅक होऊ नये आणि पोलिसांना सुगावा लागू नये' म्हणून आफ्रीदी कोणत्याही साध्या नंबरवरून फोन करत नव्हता. तो केवळ व्हॉट्सअॅप कॉलचा वापर करून ऑर्डर घ्यायचा आणि गुटख्याची डिलिव्हरी करायचा. त्याला वाटले आपण पोलिसांच्या रडारवरून गायब आहोत, पण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल बाळासाहेब गुंजाळ यांच्या गुप्त बातमीदारांनी या नेटवर्कचा माग काढला आणि तस्करांचा सगळा प्लॅन उलथापालथ झाला.

मिळालेल्या पक्क्या माहितीच्या आधारे पोलिसांनी खंडेरायवाडी येथील धारोबा मंदिराजवळ सापळा रचला. तिथे ताडपत्रीच्या आडोशाने लपवून ठेवलेला प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूचा साठा पोलिसांना मिळून आला. यावेळी पोलिसांनी प्रभाकर अण्णासाहेब गुळवे (वय ३८, रा. रणखांब) याला रंगेहाथ पकडले. गुटख्याला जागा उपलब्ध करून देणारा राजू नामदेव ढेरंगे आणि मुख्य सप्लायर आफ्रीदी पठाण यांच्यासह तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**गुन्ह्यात वापरलेला महागडा फोन जप्त...!**

या कारवाईत पोलिसांनी तंबाखूजन्य पदार्थांसह गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेला तब्बल ४० हजार रुपयांचा 'ओप्पो रेनो १५ प्रो ५जी' हा हायटेक मोबाईल जप्त केला आहे. या फोनमधून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.

**नवीन कायद्याचा बडगा!**

अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार यांच्या उपस्थितीत जप्त केलेला साठा सील करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आरोपींवर नवीन भारतीय न्याय संहिता (इछड), २०२३ आणि अन्न सुरक्षा कायद्यान्वये कडक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या तस्करीचे धागेदोरे आणखी कुठे पसरले आहेत? आफ्रीदी हा गुटखा कुठून आणत होता? याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजय कौते अत्यंत वेगाने करत आहेत.

# नेवासा मार्केटच्या खुल्या कांदा विक्रीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा कृषी उत्पन्न बाजार समिती नेवासा येथे दर मंगळवारी व गुरुवारी खुल्या कांद्याची विक्री होते आता शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सभापती नंदकुमार पाटील यांनी रविवारी देखील खुल्या कांदा विक्री परवानगी दिली त्यामुळे या पहिल्याच रविवारी कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.रविवारी शंभर वाहनांची नोंद झाली.

पहिल्याच रविवारी दि.१४ जून रोजी खुल्या कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. बाजार समितीत एकूण शंभरच्या वर शेतकऱ्यांनी शंभर वाहनांडरे कांदा विक्रीसाठी आणला होता.तब्बल ४ हजार ९९०क्विंटल उन्हाळी कांद्याची आवक नोंदविण्यात आली.

बाजारात कांद्याला दर्जानुसार चांगला भाव मिळाला. एक नंबर कांद्याला सरासरी प्रतिक्विंटल १५०० पर्यंत कमाल भाव मिळाला तर किमान भाव दोनशे प्रति क्विंटल,८०० ते १००० सरासरी भाव मिळाला भाव मिळाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली

आठवड्यात मंगळवारी, गुरुवारी आणि आता रविवारी नेवासा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात खुल्या कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्यामुळे बाजार परिसरात दिवसभर व्यापारी व शेतकऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.यावेळी बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.




याबाबत बोलताना बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी सांगितले की आमचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख पाटील यांच्या नेतृत्वाखाली नेवासा कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांच्या सेवेसाठी सदैव तत्पर व कटिबद्ध असून शेतकऱ्यांना योग्य दर देण्यासाठी बाजार समिती प्रयत्नशील असून पंचक्रोशीतील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त कांदा नेवासा मार्केट कमिटीमध्ये आणावा असे आवाहन सभापती नंदकुमार पाटील व संचालक मंडळाने केले आहे.

# मोफत पाठ्यपुस्तक वाटप विद्यार्थी पालकांची चेष्टा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूरः (शफीक बागवान)**

राज्य शासन अनेक वर्षे विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरित आहे . मात्र प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना सर्व पुस्तकेच प्राप्त होत नाहीत. हे आता नित्याचेच झाले आहे. पहिल्याच दिवशी अर्धवट मोफत पाठ्यपुस्तके वाटप कार्यक्रम करून उर्वरित पुस्तकांची विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक वाट पहात असतात. पुस्तके कमी जास्त माहिती संबंधित शाळांकडून दर चार दिवसांनी माहिती मागविण्यात येते. मात्र प्रथम सत्र उलटे पर्यंत उर्वरित पुस्तके येतच नाहीत. हा विद्यार्थी, पालक शिक्षक तसेच शिक्षण प्रेमी व्यक्तींचा मागील अनेक वर्षांचा अनुभव आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. जिल्ह्यात शिक्षण विभागाने दरवर्षाप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांना पुस्तके मोफत देण्याचा उपक्रम राबविणार आहे. शासनाने मोफत पाठ्यपुस्तक वाटप करण्याचे निश्चित झाल्यापासून पुस्तक विक्रेत्यांनी पुस्तके विक्री बंद केली . त्यामुळे पालक आपल्या पाल्यांना पुस्तके खरेदी ही करु शकत नाही, अशी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास खुंटला आहे.



# पढेगावच्या सहकार चळवळीतील ज्येष्ठ नेतृत्व हरपले; आण्णासाहेब बनकर यांचे निधन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** पढेगाव येथील ज्येष्ठ सहकार नेते, सामाजिक कार्यकर्ते तथा विविध सहकारी संस्थांचे माजी पदाधिकारी आण्णासाहेब भानुदास बनकर (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने पढेगावसह श्रीरामपूर तालुक्यात शोककळा पसरली असून सहकार क्षेत्रातील एक अभ्यासू व अनुभवी नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

आण्णासाहेब बनकर यांनी सहकार क्षेत्रात दीर्घकाळ कार्य करताना अनेक संस्थांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. श्रीरामपूर सूतगिरणीचे चेअरमन अशोक सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन अशोक सहकारी साखर कारखान्याचे



संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. तसेच पढेगाव विकास सोसायटीचे अनेक वर्षे अध्यक्ष राहून संस्थेच्या प्रगतीसाठी त्यांनी उल्लेखनीय प्रयत्न केले.

स्वभावाने मनमिळावू आणि अभ्यासू असलेल्या बनकर यांचे माजी खासदार कै. बाळासाहेब विखे पाटील, माजी खासदार गोविंदराव आदिक, ज्येष्ठ नेते टेकावडे तसेच माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. ग्रामीण भागातील सहकार चळवळीच्या बळकटीकरणासाठी त्यांनी सातत्याने काम केले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, पाच बहिणी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. डी. डी. काचोळे विद्यालयाचे शिक्षक सुनील बनकर यांचे ते वडील व पुणे येथील बांधकाम व्यावसायिक सतिष बनकर यांचेही ते वडील होत. प्रगतशील शेतकरी भिकाजी बनकर यांचे ते ज्येष्ठ बंधू तर मुळा प्रवाराचे मुख्य हिशोबनीस दत्तात्रय बनकर यांचे ते बंधू होत.

त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विविध राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# दारुड्या भाविकांचा जेजुरीत धुडगूस

## कुटुंबावर जीवघेणा हल्ला, १० जण जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**जेजुरी :** सोमवती अमावास्येनिमित्त खंडोबा दर्शनासाठी आलेल्या ठाणे जिल्ह्यातील पिंपरने येथील काही आगरी भाविकांनी मद्यप्राशन करून जेजुरीत धिंगाणा घातल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारी घडली. आपापसातील वादातून सुरू झालेली मारामारी सोडवण्यासाठी गेलेल्या स्थानिक गोडसे कुटुंबावर संबंधितांकडून जीवघेणा हल्ला करण्यात आला. या घटनेत एकाच कुटुंबातील सहा जण गंभीर जखमी झाले असून एकूण दहा जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवती अमावास्येनिमित्त दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गटातील काही व्यक्तींनी मद्यप्राशन केले होते. त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद होऊन हाणामारी सुरू झाली. हा वाद मिटविण्यासाठी गेलेल्या गोडसे कुटुंबीयांवरच संतप्त झालेल्या संबंधितांनी हल्ला चढवला. हल्लेखोरांनी महिलांनाही मारहाण केल्याचा आरोप असून महिलांशी गैरवर्तन व शिवीगाळ करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. गोडसे कुटुंबातील महिलांना गंभीर दुखापत झाली आहे.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तिघांना जेजुरी येथील आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले असून इतर जखमींवर उपचार सुरू आहेत. हल्लेखोरांच्या वाहनातून मद्याच्या बाटल्या आढळल्याचेही सांगितले जात आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, हल्लेखोरांकडे तलवारीसारखी घातक शस्त्रे होती. काही तरुणांनी बेधडकपणे वृद्ध नागरिकांवरही हल्ला केला. इतकेच नव्हे तर ७५ वर्षीय वृद्धाच्या अंगावर धावून जाऊन त्याला चावा घेत गंभीर दुखापत केल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा सर्व प्रकार रविवारी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास घडला.

घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी जेजुरी पोलीस ठाण्यात धाव घेत कठोर कारवाईची मागणी केली. पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले असून काही आरोपी घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती आहे. दोन्ही बाजूंच्या जखमींवर उपचार सुरू आहेत.


सोमवती अमावास्येसारख्या पवित्र पर्वकाळात घडलेल्या या घटनेमुळे जेजुरी परिसरात संतापाची लाट उसळली आहे. जेजुरीकरांवरील वाढते हल्ले हा चिंतेचा विषय बनला असून दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास गावबंद आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. घटनेची माहिती मिळताच अनेक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, माजी व विद्यमान नगरसेवक तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी जेजुरी पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांची तत्परता; मुलीला पळवण्याचा डाव फसला, कौतुकास्पद कामगिरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या तल्लख बुद्धिमत्तेमुळे आणि तातडीच्या हालचालींमुळे एका तरुण-तरुणीला पळवून नेण्याचा मोठा डाव अवघ्या दोन तासांत हाणून पाडण्यात आला. संवेदनशील प्रकरणाची व्याप्ती आणि गांभीर्य ओळखून अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा पोलिसांनी केलेली ही धडाकेबाज कारवाई परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे.

दोन्ही बाजूंकडून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न शनिवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास एका मुलाचे नातेवाईक पोलीस ठाण्यात आले. ''मुलगा कामाला जातो असं सांगून गेला तो परतला नाही,'' अशी तक्रार त्यांनी दिली. मात्र, पोलिसांना माहिती देताना ते दिशाभूल करत असल्याचा संशय पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना आला. त्यांनी तात्काळ पोलीस पाटलांशी संपर्क साधला असता, गावातून एक मुलगीही बेपत्ता असल्याचे समोर आले. मुलीच्या नातेवाईकांनीही पोलिसांना चुकीची माहिती देण्याचा प्रयत्न केला, परंतु दराडे यांच्या सतर्कतेमुळे त्यांचे सर्व डावपेच



अपयशी ठरले.

मुलाचा 'शातिर' प्लॅन;पोलिसांची चक्रावून टाकणारी खेळी

लोकेशन ट्रॅकिंग आणि थरारक पाठलाग

अन... चालत्या बसमधून मुलीला घेतले ताब्यात!

मुलाचे लोकेशन तपासले असता मुलगा हा नेवासाच्या बाजूलाच असल्याचे निष्पन्न झाले त्याला ताब्यात घेतले असता पोलिसांचा खाक्या दाखवताच तो पोपटासारखा बोलू लागला त्याने मुलीला पंढरपूरला जाणाऱ्या बसमध्ये बसवून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे (श्रीरामपूर विभाग) आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (शेवगाव विभाग) नीरज राजगुरू यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले होते. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी वेळ न घालवता गुन्हा दाखल करण्याच्या आणि परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार, संबंधित मुलावर अपहरण आणि पोक्सो (झजउडज) कायद्यातील गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करून त्याला तत्काळ अटक करण्यात आली आहे. दराडे यांनी तातडीने संबंधित बस डेपो आणि पंढरपूर पोलिसांशी संपर्क साधला. बस चालकाच्या मोबाईलवरून मुलाशी झालेला शेवटचा संपर्क आणि लोकेशनचा आधार घेत, चालत्या बसमधून मुलीला सुखरूप ताब्यात घेण्यात आले.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे (श्रीरामपूर विभाग) आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (शेवगाव विभाग) नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे आणि त्यांच्या टीमने केली

**''छेडछाड कराल तर याद राखा; थेट संपर्क करा!'' : पो. नि. दराडे**

या कारवाईनंतर पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी मुलींच्या सुरक्षेसाठी अत्यंत कडक इशारा दिला आहे. ते म्हणाले, ''मुलींना कोणी छेडत असेल, पाठलाग करत असेल किंवा मोबाईलवर मेसेज करून त्रास देत असेल, तर घाबरू नका. अशा विकृत मानसिकतेच्या व्यक्तींना 'जागेवर चोप' दिला जाईल. पालकांनी आणि मुलींनी कोणत्याही संकोचाशिवाय माझ्याशी ७३८५५५३१२० या क्रमांकावर संपर्क साधावा.''

''अशा घटनांमध्ये पीडित मुलीचे नाव आणि तिचे आडनाव पूर्णपणे गुप्त ठेवले जाईल. समाजकंटकांना मुळापासून ठेचून काढण्यासाठी पोलिसांना मदत करा, आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत असे आवाहन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी केले आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि. १५ जून २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-६ | १५०<br>१६९<br>६०० | जोड<br>५९-१६-३२-८०-६४ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९<br>२४८<br>४४६ | ४-७ | १६०<br>२५०<br>७०० | जोड<br>४३-६७-२१-९५-७० |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६<br>१३७<br>१०० | १-८ | १२५<br>१७०<br>११६ | जोड<br>१२-०८-४९-७६-८५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| | |
|---|---|
| 09/03/2026 | 2 2 1 8 5 82 13 1 |
| To | 316 4 6 56 8705 8443 43093 |
| 13/03/2026 | 6 0 8 0 8 98 84 5 |
| 16/03/2026 | 4 8 2 3 4 41 16 3 |
| to | 556 9 0 21 8602 9202 37387 |
| 20/03/2026 | 6 9 0 0 0 97 80 8 |
| 23/03/2026 | 6 3 4 1 5 71 23 1 |
| to | 834 5 5 46 7603 8346 43646 |
| 27/03/2026 | 9 6 5 8 9 80 00 7 |
| 30/03/2026 | 2 1 1 1 2 11 11 2 |
| to | 890 3 3 87 6797 1112 56665 |
| 03/04/2026 | 9 6 4 0 0 99 69 9 |
| 06/04/2026 | 1 2 1 7 1 43 11 4 |
| to | 370 2 4 02 7398 7582 52786 |
| 10/04/2026 | 3 6 5 8 5 70 64 8 |
| 13/04/2026 | 5 1 1 6 2 51 82 1 |
| to | 606 5 4 43 7345 0377 96854 |
| 17/04/2026 | 9 0 9 0 9 03 00 0 |
| 20/04/2026 | 5 1 8 4 1 35 33 3 |
| to | 700 2 8 58 5253 5571 84687 |
| 24/04/2026 | 8 7 9 9 2 57 09 8 |
| 27/04/2026 | 3 1 4 7 1 16 16 2 |
| to | 563 2 4 85 8671 2729 98275 |
| 01/05/2026 | 8 0 0 0 0 89 98 0 |
| 04/05/2026 | 1 3 1 6 2 22 22 2 |
| to | 771 9 4 34 8348 7425 54665 |
| 08/05/2026 | 9 9 8 0 9 96 80 9 |
| 11/05/2026 | 5 2 3 2 6 21 14 1 |
| to | 679 7 7 04 3068 3901 27855 |
| 15/05/2026 | 6 0 0 9 0 30 87 9 |
| 18/05/2026 | 8 4 5 1 1 17 42 2 |
| to | 979 5 6 96 7422 2830 88935 |
| 22/05/2026 | 0 0 8 8 7 98 89 6 |
| 25/05/2026 | 5 2 3 1 8 41 24 5 |
| to | 611 9 4 37 3978 6905 56065 |
| 29/05/2026 | 0 0 6 3 0 80 80 6 |
| 01/06/2026 | 4 1 9 1 2 51 |
| to | 489 3 9 80 2682 721 |
| 05/06/2026 | 0 5 0 7 0 08 |

# मुळाधरण परिसरातील अवैध माती उत्खननावर पाटबंधारे विभागाची धडक कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**म्हैसगाव, :** राहुरी तालुक्यातील मुळाधरण परिसरातून वीटभट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणावर मातीचे अवैध उत्खनन सुरू होते. त्यांची बातमी दै राष्ट्री सह्याद्री वृत्तपत्राने प्रसारित केली होती. त्याची दखल घेऊन मुळ पाटबंधारे विभागाने राजेंद्र प्रकाश जल सांप्रदाय विभाग आहिल्यनगर ,शाखा अभियंता - आर जे पारखे

बीटधारक - बाळासाहेब थोरात, सुनील हरिशचंद्रे , सुनील भिसे राजेंद्र प्रकाश (जल सांप्रदाय विभाग आहिल्यनगर वाहनचालक- संभाजी सांगळे धडक कारवाईची मोहीम हाती घेतली होती. दरडगाव थडी, म्हैसगाव आणि चिखलठाण परिसरात अनेक धडक कारवाई करण्यात आली आहे . दिवसभरात ६ गाड्या पकडण्यात आल्या होत्या गाडीवाल्यांनी ही चुकीची माहिती देऊन महसूल विभागाला पुढे केले आहे ही माती मुळाची नाही असे बोलून फळ वाट काढली आहे रस्त्याने चाललेल्या गाडी ही अडवण्यात आल्या होत्या त्यांनी ही माहिती चुकीची दिली असल्याने कारवाई होऊ शकली नाही अधिकारी यांनी राहुरी तहसील व तलाठी विभागाला संपर्क करून माहिती देण्यात आले आहे.

खुप दिवसांपासून सुरू असलेल्या या माती अवैध उत्खननाकडे संबंधित महसूल

## यंत्रसामग्रीसह वाहनचालकांनी काढला पळ

विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. माहितीनुसार, मुळ धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर धरण परिसरातील मोकळ्या झालेल्या जागेतून वीटभट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणावर माती उपसण्याचे काम सुरू होते. सुरुवातीला मर्यादित स्वरूपात सुरू असलेले हे उत्खनन कालांतराने मोठ्या प्रमाणावर वाढले. दिवस-रात्र जेसीबी, हायवा, ट्रॅक्टर आणि इतर वाहनांच्या साहाय्याने मातीची वाहतूक केली जात असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

या अवैध उत्खननामुळे धरण परिसरातील नैसर्गिक रचना बिघडण्याचा धोका निर्माण झाला असून शेतकऱ्यांच्या शेतीवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत वारंवार तक्रारी होऊनही महसूल विभागाने ठोस कारवाई न केल्यामुळे माती माफियांचे मनोबल वाढल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, या प्रकाराची माहिती मुळ पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर यांच्या निदर्शनास आल्यानंतर विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाईसाठी पथकासह दरडगाव थडी, म्हैसगाव व चिखलठाण परिसरात धडक दिली. मात्र कारवाईची माहिती आधीच माती उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांना मिळाल्याची चर्चा असून, पथक घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच अनेक वाहनचालकांनी जी सी पी, हायवा, ट्रॅक्टर आणि इतर यंत्रसामग्रीसह तेथून पळ काढला आहे.

अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणांची पाहणी करून उत्खननाचे पुरावे आणि परिस्थितीचा आढावा घेतला. काही ठिकाणी मोठे खड्डे पडलेले असून मोठ्या प्रमाणावर माती काढण्यात आल्याचे



प्राथमिक निरीक्षणात आढळून आल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणात संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत विभागीय सूत्रांकडून देण्यात आले.

स्थानिक नागरिकांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अवैध उत्खननास जबाबदार असलेल्या व्यक्तींवर तसेच दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी केली आहे. मुळ धरण परिसरातील नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

या कारवाईमुळे मुळ धरण परिसरात सुरू असलेल्या अवैध माती उत्खननाच्या प्रकारावर प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, पुढील काळात संबंधित विभागांकडून अधिक कठोर कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## द•ख•ल

### चांदा येथे अखंड हरिनाम सप्ताह व नवनाथ पारायण सोहळ्यास प्रारंभ

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथील कानिफनाथ मंदिर (भालके वस्ती) येथे अखंड हरिनाम सप्ताह व नवनाथ पारायण सोहळ्यास शुक्रवारी (दि. १२ जून) उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. सप्ताहानिमित्त दररोज पहाटे काकडा भजन, नवनाथ पारायण वाचन, हरिपाठ तसेच सायंकाळी कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सोहळ्यात ह.भ.प. सचिन महाराज पुंड, ह.भ.प. तुकाराम महाराज केसभट वाघोलीकर, ह.भ.प. पंडित महाराज भुतेकर यांची कीर्तने झाली असून पुढील दिवसांत गणेश महाराज कुदळे, ज्ञानेश्वर महाराज तांबे आणि रामेश्वर महाराज राऊत शास्त्री यांची कीर्तने होणार आहेत. शुक्रवार, दि. १९ जून रोजी सकाळी गंगेवरून आणलेल्या कावडीची मिरवणूक काढण्यात येणार असून त्यानंतर श्री कानिफनाथ महाराजांच्या मूर्तीवर जलाभिषेक केला जाईल. सायंकाळी रामायणाचार्य ह.भ.प. देविदास महाराज आडभाई यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसाद वितरण होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### पाईपलाईनमध्ये आढळला भला मोठा कोब्रा; सर्पमित्राच्या तत्परतेने धोका टळला

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील प्रतापूर येथे शेतकरी संजय बिडवे यांच्या शेतातील पाणी पाईपलाईनमध्ये भला मोठा कोब्रा साप आढळून आल्याने काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र सर्पमित्र शिवप्रसाद पवार यांच्या तत्परतेमुळे संभाव्य धोका टळला. संजय बिडवे हे शेतातील पाणी पाईपलाईनची पाहणी करत असताना त्यांना पाईपमध्ये मोठ्या आकाराचा कोब्रा साप दिसून आला. त्यांनी कोणतीही घाई न करता तत्काळ सर्पमित्र शिवप्रसाद पवार यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच शिवप्रसाद पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. आवश्यक खबरदारी घेत त्यांनी कोब्राला सुरक्षितरीत्या हाताळत पकडले. त्यानंतर सापाला कोणतीही इजा न पोहोचवता वन्यजीव नियमांचे पालन करून नैसर्गिक अधिवास असलेल्या जंगल परिसरात सोडून देण्यात आले. सर्पमित्र पवार यांच्या या धाडसी आणि तत्पर कार्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही. त्यांच्या कार्याचे प्रतापूर व परिसरातील ग्रामस्थांकडून कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. तसेच वन्यजीव दिसल्यास त्यांना इजा न करता तज्ज्ञ सर्पमित्रांची मदत घ्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.



### आई-वडिलांचे स्वप्न साकार; रोहित कापसे फूड अँड ड्रग्ज इन्स्पेक्टर परीक्षेत राज्यात प्रथम

**शिर्डी :** जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर पिंपळस गावातील रोहित कापसे यांनी फूड अँड ड्रग्ज इन्स्पेक्टर (अन्न व औषध निरीक्षक) परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवत आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. त्यांच्या या यशामुळे कापसे परिवारासह संपूर्ण पिंपळस गावाचा गौरव वाढला आहे. रोहित हे भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष, सरचिटणीस, पिंपळस गावचे माजी सरपंच तसेच श्री गणेश सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक नितीनराव कापसे यांचे सुपुत्र आहेत. घरची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत असतानाही रोहित यांनी स्वतःच्या कर्तृत्वावर मोठे पद मिळविण्याचा निर्धार केला होता. एम. फार्म पदवीधर असलेल्या रोहित यांच्यासमोर नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होत्या. मात्र त्यांनी त्या नाकारून फूड अँड ड्रग्ज इन्स्पेक्टर होण्याचे ध्येय निश्चित केले. गेल्या वर्षभरापासून त्यांनी स्वतःला अभ्यासात झोकून दिले. घरातील माडीवरील खोलीत एकाग्रतेने अभ्यास करून त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली. नाशिक केंद्रावर परीक्षा दिल्यानंतर उत्तरतालिकेच्या आधारे स्वतःला १३३ गुण मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांचा अंदाज खरा ठरला आणि १३३ गुणांसह त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. रोहित यांच्या यशाची बातमी समजताच पिंपळस गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मित्रपरिवार व ग्रामस्थांनी आतषबाजी करून जल्लोष साजरा केला. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# जोर्वे येथील यशदीप दिघे यांची एनडीए मधून लेफ्टनंटपदी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** जोर्वे येथील सेवानिवृत्त सैनिक राजेंद्र रावसाहेब दिघे यांचे चिरंजीव यशदीप उर्फ सनी राजेंद्र दिघे हे देहरादून येथून एनडीएचे प्रशिक्षण पूर्ण करून देशसेवेसाठी लेह लडाख येथे लेफ्टनंट पदावर आर्मीमध्ये कार्यरत होणार आहेत.



जोर्वे येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजेंद्र दिघे यांनी भारतीय सैन्यामध्ये २७ वर्ष सेवा दिली. ज्या दिवशी ते निवृत्त झाले त्याच दिवशी त्यांचा मुलगा यशदीप याची एनडीए मध्ये निवड झाली. हा मोठा योगायोग होता यशदीपने पुणे येथील खडकवासला येथे तीन वर्षाचे ट्रेनिंग पूर्ण केल्यानंतर एक वर्ष देहरादून येथे आपले प्रशिक्षण पूर्ण केले.

भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी जी मुरमु व विविध केंद्रीय मंत्री मुख्यमंत्री यांच्या देहरादूनच्या एनडीए अकॅडमीमध्ये उपस्थितीमध्ये एनडीएचा पदग्रहण समारंभ मोठ्या शानदार पद्धतीने संपन्न झाला.

यावेळी यशदीप चे वडील मेजर राजेंद्र दिघे ,आई सौ.पूजा दिघे, व प्रांजल दिघे यांच्यासह कुटुंबीय उपस्थित होते. लहानपणापासूनच भारतीय सैन्यातून देशसेवा करण्याचे आपले स्वप्न होते. ते पूर्ण झाले असल्याची भावना यावेळी लेफ्टनंट यशदीप दिघे यांनी व्यक्त केली. ते लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे जनसंपर्क अधिकारी नामदेव कहांडळ यांचे भाचे आहेत. लेफ्टनंट यशदीप दिघे यांच्या यशाबद्दल महाराष्ट्राचे मा. महसूल व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा.आ. डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, दुर्गाताई तांबे, इंद्रजीत भाऊ थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, शरद थोरात, पुंजाहरी दिघे, सुरेश थोरात, शेती संघाचे मॅनेजर अनिल थोरात, रावसाहेब दिघे,अर्जुन दिघे, सर्जेराव दिघे, प्रभाकर रामकर, सोमनाथ रामकर ,गणेश कहांडळ, सुनील थोरात, सतीश कहांडळ ,राजेंद्र कहांडळ, संजय खैरनार यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## आजपासून 'सुना येती घरा' प्रेक्षकांच्या भेटीला मराठीतील एव्हरग्रीन अभिनेते अशोक शिंदे यांची नवी मालिका

**स्टार प्रवाह वरील बिग बजेट मालिका दररोज सायंकाळी सात वाजून ३० मिनिटांनी प्रक्षेपित होणार.**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** मराठी चित्रपट सृष्टीतील एव्हरग्रीन हिरो अभिनेते अशोक शिंदे यांची भूमिका असलेली ''सुना येती घरा'' ही बिग बजेट मालिका १५ जून पासून दररोज सायंकाळी सात वाजून ३० मिनिटांनी स्टार प्रवाह चॅनेलवर प्रसारित होणार असल्याची माहिती अभिनेते अशोक शिंदे यांनी दैनिक राष्ट्र सह्याद्रीशी बोलताना दिली अशोक शिंदे यांच्याशी भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला असता या मालिकेविषयी माहिती देताना ते म्हणाले की फ्रेम्स कंपनीने ही मालिका केली असून सतीश राजवाडे यांनी हा शो लॉन्च केला आहे महाराष्ट्रातील घराघरात असणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नावर या मालिकेत प्रकाशझोत टाकण्यात आलेला आहे अशोक शिंदे यांनी या मालिकेत कुटुंब प्रमुख ''शिवनाथ'' ची भूमिका केली आहे तर शिवनाथ यांच्या पत्नीची भूमिका सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री दीपक परब यांनी केली आहे. यांचे सह पल्लवी वाघ मनोज कोल्हटकर मेघना वैद्य यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका या मालिकेत असून या मालिकेत अनेक नवीन चेहऱ्यांना भूमिका करण्याची संधी मिळाली आहे. या मालिकेच्या काही भागांचे बाह्य चित्रकरण सातारा येथे झाले असून उर्वरित चित्रीकरण मुंबई येथे सुरू आहे. मालिकेचे निर्माता दीप चंदा हे असून दिग्दर्शक शैलेंद्र शिरसेकर हे आहेत. अश्विनी इंगळे डीओपी चंद्रशेखर नरेंद्र मुधोळकर आदींनीही या मालिकेसाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. छोट्या पडद्यावरील मराठीतील




ही बिग बजेट मालिका असल्याचेही अभिनेते अशोक शिंदे यांनी सांगितले. या मालिकेची कथा कुटुंबप्रमुख'' शिवनाथ '' व त्याच्या कुटुंबातील इतर व्यक्तीरेखे भोवती फिरते या मालिकेत'' शिवनाथ'' यांनी प्रेम विवाह केलेला असतो परंतु तो त्याच्या तीन मुलांना प्रेम विवाह करण्यास नकार देतो शिवनाथ मुलांना प्रेमविवाह करण्यास नकार का देतो.याचे कारण पहिल्या १५ भागात सांगितले आहे. ''सुना येती घरा'' ही मालिका पाहिल्यानंतरच कथानकाचा उलगडा होईल त्यामुळे सर्वांनीच ही मालिका आवर्जून पहावी असेही अशोक शिंदे यांनी दैनिक ''राष्ट्र सह्याद्री'' बोलताना सांगितले. अभिनेते अशोक शिंदे हे मराठीतील सुपरस्टार आहेत व एवर ग्रीन अभिनेते आहेत अशोक शिंदे यांनी आजपर्यंत २५० मराठी चित्रपट व शंभर मालिकेतून विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या आहेत त्यांना उत्कृष्ट अभिनयाचे अनेक अवार्ड मिळाले आहे.

# विद्यार्थ्यांनी यशामध्ये सातत्य ठेवावे : डॉ. वंदनाताई मुरकुटे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान:** शालेय जीवनातील यश हे करिअरच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे असून दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी यशामध्ये सातत्य ठेवावे असे प्रतिपादन मा. सभापती व प्राईड अकॅडमीच्या संचालिका डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी केले. ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था व प्राईड अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावी परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मुरकुटे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड धनराज कोकणे होते. यावेळी पुढे बोलताना मुरकुटे म्हणाल्या की यश मिळवताना अपयश आले तरी डगमगून न जाता विद्यार्थ्यांनी प्रयत्नां मध्ये सातत्य ठेवून जिद्दीने व चिकाटीने आपले ध्येय पूर्ण करावे. जीवनामध्ये चांगले करिअर मिळवण्याची संधी विद्यार्थ्यांनी सोडू नये. त्यावरच आपल्या उज्वल भविष्याची इमारत उभी असते. त्याचप्रमाणे जीवनामध्ये चांगले यश मिळवून काबाड कष्ट करणाऱ्या आपल्या आई वडिलांचे व आपले स्वप्न पूर्ण करावे असे त्या म्हणाल्या. याप्रसंगी न्यू इंग्लिश स्कूल टाकळीभान दहावी व बारावीचे गुणवंत विद्यार्थी, ग्रामीण माध्यमिक विद्यालय टाकळीभान इयत्ता दहावीचे गुणवंत विद्यार्थी, त्याचप्रमाणे प्राईड अकॅडमी स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे गुणवंत विद्यार्थी यांचा याप्रसंगी शालेय साहित्य देऊन सत्कार करण्यात येऊन त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले. यावेळी ॲड धनराज कोकणे यांनी शिक्षणाचे महत्त्व विशद करून चांगल्या शिक्षणाडरेच भविष्यातील सुजाण नागरिक घडू शकतात असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अर्जुन राऊत यांनी केले. कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ ग्रामस्थ श्रीधर गाडे , सामाजिक कार्यकर्ते भैय्या पठाण, खिर्डीचे तंटामुक्त अध्यक्ष भरत जाधव, सर्जेराव पटारे




,सुदाम पटारे, विठ्ठल आबुज , पोपट सपकळ, टाकळीभान प्राईड प्री स्कूलच्या प्राचार्य जयश्री वाडेकर, शिक्षक प्रदीप गोराणे, शिक्षिका ज्योती मिरीकर , आदिती जंगम आदींसह गुणवंत विद्यार्थी, पालक ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वांचे आभार प्रदीप गोराणे सर यांनी मानले.

## राज्य फेडरेशनच्या अध्यक्षपदी दीपक पटवर्धन; कार्यकारी अध्यक्षपदी काका कोयटे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नागिरी येथील श्री स्वामी स्वरूपानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष दीपक पटवर्धन यांची, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा (काका) कोयटे यांची कार्यकारी अध्यक्ष (वर्किंग प्रेसिडेंट) म्हणून एकमताने निवड करण्यात आली. ही माहिती फेडरेशनचे संचालक वासुदेव काळे यांनी दिली. पुणे येथे १२ जून रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीत अनेक संचालकांनी काका कोयटे यांनी अध्यक्षपद स्वीकारावे, अशी विनंती केली. मात्र वाढते वय, विविध संस्थात्मक व शैक्षणिक जबाबदाऱ्या तसेच आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज यामुळे त्यांनी अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार दिला. त्यानंतर सर्वानुमते दीपक पटवर्धन यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. पटवर्धन यांच्या आग्रहास्तव आणि संचालक मंडळाच्या एकमुखी पाठिंब्याने काका कोयटे यांची कार्यकारी अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, व्यापक संपर्क आणि नेतृत्वगुणांमुळे कोयटे यांचे मार्गदर्शन फेडरेशनसाठी महत्त्वाचे ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या प्रश्नांवर कायदेतज्ज्ञ दीपक पटवर्धन आणि अनुभवी सहकार नेते काका कोयटे यांची जोडी प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास संचालक मंडळाने व्यक्त केला. निवडीनंतर राज्यभरातील सहकारी पतसंस्था पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त करत नव्या नेतृत्वाचे स्वागत केले.

# प्रयत्न करूनही न सुटणारे प्रश्न हे प्रार्थनेतून सुटतात : महंत उद्धव महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** आज माणसं भगवंताच्या भक्तीचाही दिखावा करतात. देव दर्शनाच्या ठिकाणी तेथील महात्म्य जाणून घेण्याऐवजी माणसं फोटो काढण्यात व स्टेट्स ठेवण्यात धन्यता मानतात. परंतु भगवंत सेवेत भाव महत्वाचा असतो कारण भावपूर्वक केलेली सेवाच भगवंताला प्रिय असून प्रार्थना ही अंधश्रद्धा नाही तर आयुष्यामध्ये प्रयत्न करूनही न सुटणारे प्रश्न हे प्रार्थनेतून सुटतात असे प्रतिपादन गुरुवर्य बाबा ह.भ.प.महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांनी केले.

सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रम,नेवासा बुद्रुक (सूरेगांव रस्ता) येथे वद्य एकादशी व पुरुषोत्तम मास निमित्त आयोजित प्रवचन प्रसंगी गुरुवर्य महंत उद्धवजी महाराज हे बोलत होते. पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रम प्रसंगी सकाळी ८ वाजता ब्रम्हलीन सद्गुरु नारायणगिरी महाराज व सकल देवतांची पूजा, आरती संपन्न झाली.सकाळी १०:३० वाजता गुरुवर्य ह.भ.प. महंत उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांची प्रवचनरूपी सेवा संपन्न झाली.

यावेळी झालेल्या प्रवचन सोहळयात बोलतांना गुरुवर्य उद्धव महाराज म्हणाले की पसदभावनेतून पुण्य घडते.देवपूजा, पुजापाठ करणं हे देवाच्या ऋणातून उतराई होण्याचे माध्यम आहे. जीवनामध्ये परमेश्वराच्या कृपेनें प्राप्त झालेल्या संपत्तीतील काही वाटा हा देवकार्यासाठीही देता आली पाहिजे. वारकऱ्यांसाठी भक्ती हा सर्व समस्या वरील उपाय आहे.



भगवंताने प्रत्येक माणसाला कर्तव्य, नेतृत्व, दातृत्व असे वेगवेगळे गुण व वैभव दिले आहे. मनुष्याला आपले दुःख सांगण्याचे शेवटचे व हक्काचे ठिकाण म्हणजे भगवंत आहे. भगवंताकडे केलेली कोणतीच प्रार्थना वाया जात नाही फक्त त्यामध्ये आपला भक्ती भाव असला पाहिजे. प्रार्थना ही अंधश्रद्धा नाही तर आयुष्यामध्ये प्रयत्न करूनही न सुटणारे प्रश्न हे प्रार्थनेतून सुटतात. बाबा पुढे म्हणाले की, मनुष्य प्रपंचामध्ये कितीही गुंतून बसला तरी हाती काही लागत नाही तर परमार्थात केलेली कोणतीच गोष्ट वाया जात नाही. खरं तर मनुष्याला संसारात राहून पुण्य करता आलं पाहिजे. शास्त्रानुसार प्रत्येक व्यक्तीने वयाच्या पन्नाशीनंतर पुण्यधर्म केला पाहिजे. माणसाने आपल्या जीवनातील काळ हा चिंतनामध्ये घालवला पाहिजे.

पाऊस लांबल्यामुळे आज शेतकरी अडचणीत आहे. शेतकऱ्यांनी शेतात चांगलं पिकवलं तरच बाकीच्या गोष्टी सुरळीत होतात. त्यामुळे लवकर पाऊस पडणं तितकंच महत्वाचे आहे. सद्गुरु आश्रमाच्या उभारणी पासून आजपर्यंतच्या वाटचालीत परिसराचा व सर्वच परमार्थतील स्नेहीजणांचा मोलाचा वाटा राहिला आहे. गेली तीन वर्षांपासून अविरतपणे मधुकरी प्रसादाची सेवा देणाऱ्या दात्यांचे बाबांनी आभार मानले.

प्रवचनानंतर वेगवेगळ्या प्रकारची सेवा देणाऱ्या दात्यांचा गुरुवर्य उद्धव महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी झालेल्या प्रवचन सोहळयाच्या प्रसंगी आश्रमाचे शिक्षक बाळासाहेब झिने यांनी सूत्रसंचालन केले.यावेळी सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रम परिवाराच्या वतीने आमरस व फराळ प्रसाद पंगत देण्यात आली.याप्रसंगी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी, भजनी मंडळ,भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेवासा येथे धोंडयाच्या कार्यक्रमात खंडेरायांना धोंड्यासह मिष्टान्नाचा भोग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** खंडोबादेवाच्या सासुरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिरात अधिक पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने आयोजित धोंडा कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी मार्तंड भैरव खंडेरायांना धोंड्यासह मिष्टान्नाचा भोग देण्यात येऊन खंडेरायांच्या रूपाने आलेल्या उपस्थित जावई बापूंचा सन्मान करण्यात आला.

पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिर जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे व जीर्णोद्धार समितीच्या पुढाकाराने व ग्रामस्थांच्या सहकार्याने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.यावेळी संभाजीराव ठाणगे,सौ. संगीताताई ठाणगे,राजेंद्र काशीद, सौ. आशाताई काशीद यांच्या हस्ते धोंड्यासह पंच पक्वान्न मिष्टांन्नाचा भोग खंडोबारायांना देण्यात आला.खंडेरायांना धोतरपान टोपी शर्ट व म्हाळसादेवी बाणाई मातेला साडी चोळी अर्पण करण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी खरवंडी येथील वाघे सचिन शिंदे व त्यांच्या जागरण गोंधळ पथकाच्या



वतीने खंडेरायांची गाणी गाण्यात आली. खंडोबा भक्त व लेखक मार्तंड वाळके यांनी म्हाळसा खंडोबाचा महिमा प्रबोधन करत कथन केला.

कोंडीराम महाराज पेचे,बदाम महाराज पठाडे, श्रीधर महाराज अनुभुले,नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील,नेवासा नगरपंचायत चे नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले, नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार गुरुप्रसाद देशपांडे, उद्योजक बाळासाहेब मारकळी, जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे, अनिल हापसे, राजेंद्र काशीद,बाळू फसले, पोलीस पाटील दिलीप गायकवाड, प्रकाश उंडे, रविंद्र मुसमाडे, रविंद्र उसारे, सोमनाथ मरगळ, शांताराम बोर्डे, बाळू फसले, प्रकाश गुंडे,भजन जाधव, भास्करराव कणगरे,अँड. ब्राम्हणे,संदीप आलवणे, शंकर महाजन, गोरख शेंडे,प्रसाद रहाट यांच्या हस्ते तळीभांडार आरती करण्यात आली.

धोंड्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने इंदोर येथील जीर्णोद्धारासह अन्नदानासाठी योगदान देणारे खंडोबा भक्त मुक्ताजी काटे व सुशीलाबाई मुक्ताजी काटे यांनी मंदिरास भेट दिली. नगराध्यक्ष व समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या वतीने जीर्णोद्धार कमिटीने उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित हजारो भाविकांना धोंड्याच्या निमित्ताने मिष्टान्न भोजन देण्यात आले.

द•ख•ल

## पिंपळे जगताप मध्ये बिबट्याचा तीन वासरांचा हल्ला

**तळेगाव ढमढेरे :** पिंपळे जगताप (ता. शिरुर) सह वाजेवाडी परिसरात वारंवार बिबट्याचे दर्शन होत असताना बिबट्याने पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथील एका शेतकऱ्याच्या गोठ्यातील तीन वासरांवर हल्ला करत फडशा पाडल्याची घटना घडली आहे.पिंपळे जगताप (ता. शिरुर) सह वाजेवाडी परिसरात वारंवार बिबट्याचे दर्शन होत असून नुकतेच १३ जून रोजी वाजेवाडी येथे एका शेतकऱ्याच्या कोंबड्यांच्या जाळीमध्ये बिबट्या शिरला होता, त्यांनतर रात्रीच्या सुमारास पिंपळे जगताप येथील बाळासाहेब तांबे हे जनावरांना चारापाणी टाकून झोपलेले असताना सकाळच्या सुअरास त्यांचा कामगार गोठ्यात गेला असताना त्याला बिबट्याने तीन वासरांचा फडशा पाडल्याचे दिसून आले, याबाबतची माहिती मिळताच वनपरिमंडळ अधिकारी रुपावली जगताप यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असून वनविभागाने सदर परिसरात पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी पोलीस पाटील वर्षा थिटे, सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील शेळके, विकास तांबे, अतुल तांबे यांनी केली आहे, तर परिसरात तातडीने पिंजरा लावण्यात येणार असल्याचे वनपरिमंडळ अधिकारी रुपाली जगताप यांनी सांगितले.

## इनामगाव येथे घरातून सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**तळेगाव ढमढेरे :** इनामगाव (ता. शिरुर) येथे रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी दरवाजाची कडी उचकटून सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इनामगाव (ता. शिरुर) येथील नलगे मळा येथे विजय नलगे हे रात्रीच्या सुमारास जेवण करुन कुटुंबियांसह घरात झोपलेले होते, पहाटेच्या सुमारास कुटुंबीय उठले असता त्यांना शेजारील खोलीतील साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे दिसून आल्याने त्यांनी घरात पाहणी केली असता अज्ञात चोरट्याने दरवाजाची कडी उचकटून घरात प्रवेश करुन सव्वा दोन लाख रुपये किमतीचे दागिने चोरुन नेल्याचे समोर आले, याबाबत विजय सोपान नलगे (वय ५२ वर्षे रा. नलगे मळा इनामगाव ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन यथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार हे करत आहे.

## दुष्काळी डोंगररांगांमधून यशाची भरारी सागर शिंदे यांची स्टेनोग्राफर पदावर निवड



**पाबळ :** शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई परिसरातील गारकोलवाडी हे गाव अत्यंत दुष्काळी व डोंगराच्या कोपऱ्यात वसलेले आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर सागर सखाराम शिंदे यांनी महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागातील स्टेनोग्राफर (लघुलेखक) पदावर निवड मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. सागर शिंदे यांनी कोणत्याही मोठ्या शहरातील क्लासेसचा आधार न घेता घरच्या घरी अभ्यास करून हे यश संपादन केले. ग्रामीण भागातील मर्यादित सुविधा, दुष्काळी परिस्थिती आणि विविध अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर सरकारी सेवेत स्थान मिळवले आहे. त्यांच्या या यशामुळे गारकोलवाडीसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून युवकांसाठी त्यांनी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. ''परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते,'' हे सागर शिंदे यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या निवडीबद्दल गावातील ग्रामस्थ, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध सामाजिक संस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.''संघर्ष हरवतो पण आयुष्य घडवतो'' या उक्तीचा प्रत्यय सागर शिंदे यांच्या यशामुळे पुन्हा एकदा आला आहे.

# सासवड येथे आचार्य अत्रे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** आचार्य अत्रे यांच्या ५७ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित भव्य समारंभात माजी पोलीस अधिकारी सुरेश खोपडे यांना साहित्य क्षेत्रातील, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांना कला क्षेत्रातील, तर भोंदूगिरीचा पर्दाफाश करणारे खेमनर यांना पत्रकारिता क्षेत्रातील आचार्य अत्रे पुरस्कार प्रदान करण्यात आला. आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, सासवड येथे हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी विजय कोलते होते. प्रतिष्ठानचे सहसचिव बंडूकाका जगताप यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविकात विजय कोलते यांनी पुरस्कार वितरणाचे हे सलग ३७ वे वर्ष असल्याचे सांगून समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचा सन्मान केला जात असल्याचे नमूद केले.




यावेळी त्यांनी तिन्ही पुरस्कारार्थींचा परिचय करून दिला.

सुरेश खोपडे यांनी पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत असताना १९८४ मधील भिवंडी दंगल शमविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा तसेच कायमस्वरूपी सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी स्थापन केलेल्या 'मोहल्ला कमिटी' संकल्पनेचा विशेष उल्लेख करण्यात आला. त्यांच्या कार्याचा इतिहास उपस्थितांसमोर उलगडण्यात आला.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांचा नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद निवडणुकीचा आढावा घेत व त्यांच्या कार्याचा गौरव करीत त्यांचे सासवडकरांतर्फे अभिनंदन केले . यावेळी पुरंदर कलामंचच्या वतीनेही त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

भोंदू अशोक खरात याच्या दुष्कृत्याचा पर्दापाश करणाऱ्या दैनिक खबरदार चे संपादक दत्तात्रय खेमकर यांचा विशेष उल्लेख केला . या तिन्ही मान्यवरांना प्रदान केलेल्या मानपत्रांचे वाचन संतोषआबा काकडे, सुनिल लोणकर व वसंतराव ताकवले यांनी केले . साहित्यिक राजन लाखे यांनीही आपले विचार व्यक्त केले .

या प्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखेचे अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे तसेच ॲड. प्रकाश खो यांनी मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमास पुरंदर पंचायत समितीचे उपसभापती प्रवीण जगताप, पत्रकार तानाजी कोलते, बाळासाहेब मुळीक, बबनराव तावरे, गौरव कोलते, , प्रा . केशव काकडे, वामन जगताप, लक्ष्मणदादा काकडे, कुंडलिकआप्पा मेमाणे, ॲड. कलाताई फडतरे, माई कोलते, ॲड. तानाजी घारे, अक्षय पवार, तानाजी सातव , संजय राऊत , दिलीप गिरमे, संजय काटकर , संदिप टिळेकर दत्ता राऊत , अश्पाक बागवान यांच्यासह विविध , क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण यांनी आभार प्रदर्शन तर सूत्रसंचलन दीपक म्हस्के यांनी केले .

## डुंबरवाडी येथे भीषण अपघात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** डुंबरवाडी (ता. जुन्नर ) शिवारात नगर-कल्याण महामार्गावर शनिवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.




ओतूर पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १३/०६/२०२६ रोजी रात्री ११:१५ वाजण्याच्या सुमारास डुंबरवाडी हद्दीतील किगा अँस्क्रम समोर हा अपघात घडला. आळेफाटा बाजूकडून ओतूरकडे जाणारी यामाहा मोटारसायकल क्र. चक१२ दङ १३८० व कल्याण बाजूकडून नगरकडे जाणारा अशोक लिलँड कंपनीचा कंटेनर क्र. चक ४६ ु ३ २४५१ यांची समोरासमोर धडक झाली.

या अपघातात मोटारसायकलवरील प्रणव नितीन डुंबरे (वय २५, रा. ओतूर, ता. जुन्नर) आणि गणेश विजय गाडेकर (रा. डिंगोरे, ता. जुन्नर) हे दोघे जागीच ठार झाले. कंटेनर चालक गणेश बाबासाहेब शिंदे (वय ३७, रा. हिवेसिंगा, खोकारमोह, ता. जि. बीड) याला कोणतीही दुखापत झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पोलीस उपनिरीक्षक संदीप आमने, पोलीस हवलदार नरेंद्र गोराने, शामसुंदर जायभाये, जोतिराम पवार, राजेंद्र आमले,ट्रॅफिक वार्डन शुमम काशीद, संदीप शिंदे,पोलीस पाटील किरण भोर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला काढण्यात आली असून सध्या महामार्गावरील वाहतूक सुरळीत सुरू आहे.

याप्रकरणी ओतूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे अधिक तपास करत आहेत.

## हरवलेली महिला तीन मुलांसह दोन दिवसांनी सुखरूप सापडली

### ओतुर पोलिसांची यशस्वी कामगिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** आदिवासी समाजातील एक महिला तीन लहान मुलांसह हरवली असल्याची तक्रार दि. १२जून रोजी ओतुर पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आली होती. सदर महिला व मुले दोन दिवसांच्या शोध मोहिमेनंतर सुखरूप सापडली असून त्यांना पती व नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, कांता राजकिरण केदार (वय ३३) ह्या माहेर, टोकाकडे, मुरबाड, कल्याण येथून सासरी बस्ती सावरगाव, ता. जुन्नर येथे जाण्यासाठी मुलगी अनन्या ९वर्ष,मुलगा रुद्र ३ वर्ष व ७ महिन्यांचा गणेश यांच्यासह बसमध्ये निघाल्या होत्या. त्या बनकर फाटा येथे उतरल्या. पती सायं. ६ वाजता घेण्यासाठी आले, मात्र महिलेकडे मोबाईल नसल्याने भेट होऊ शकली नाही. उशीर झाल्याने त्या परत कल्याण बसने टोकाकडे येथील मामाकडे गेल्या.

महिला घरी न पोहोचल्याने नातेवाईकांनी तक्रार दाखल केली. त्यानंतर ओतुर पोलिसांनी बनकरफाटा, ओतुर, जुन्नर, पारगाव मढ व कल्याण मुरबाड येथे नातेवाईकांच्या मदतीने शोध घेतला. अखेर टोकाकडे जवळील वस्तीवर महिला मुलांसह सुखरूप आढळून आल्या.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक शुभमकुमार, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, महिला पोलीस हवलदार मोहिनी जाधव, रेश्मा फापाळे,मयुरी खोसे यांनी ही शोध मोहीम राबवली. पोलिसांच्या या तत्परतेमुळे एक कुटुंब सुखरूप एकत्र आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## शिरूर तालुक्यात पुन्हा अवैध धंद्यांचे साम्राज्य पोलिसांची कारवाई की 'लक्ष्मी दर्शन'?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शिरूर तालुक्यासह बेट भागात पुन्हा एकदा अवैध धंद्यांनी डोके वर काढले असून दारू, जुगार आणि शिरूर शहरात मटका, ड्रग्ज व्यवसाय अजूनही खुलेआम सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पोलिसांकडून अधूनमधून होणाऱ्या थातूरमातूर कारवाईमुळे अवैध व्यावसायिकांमध्ये कोणतीही भीती राहिलेली नसून कारवाईनंतर काही तासांतच हे धंदे पुन्हा सुरू होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. बेल्हा - जेजूरी रस्त्यावरील चांडोह हद्दीतील एका ढाब्यावर ४ वेळा कारवाई होऊनही तेथे दारुविक्री मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. नागरीकांनी तक्रार केल्या नंतर पोलिस तक्रारदारांची नावे ढाबा चालकांना सांगत आहे. अशी चर्चा सुरु आहे. बेट भागातील कवठे येमाई, जांबूत, मलठण, टाकळी हाजी, चांडोह, पिंपरखेड, वडनेर, आमदाबाद या ठिकाणी असण्याऱ्या धाब्यांवर नियमांना हरताळ फासत सर्रास मद्यविक्री सुरू असल्याचा आरोप होत आहे. दोन अधिकारी असूनही कारवाई होत नाही.ग्रामीण भागातील तरुणाई व्यसनांच्या विळख्यात अडकत असताना संबंधित यंत्रणा मात्र केवळ कागदी घोडे नाचवत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. शिरूर पोलीस ठाण्याअंतर्गत टाकळी हाजी दूरक्षेत्राला आलेले राहुल भागवत व गोविंद खटींग हे दोन नवीन पोलीस उपनिरीक्षक या अवैध धंद्यांना तातडीने आळा घालणार की अभय देणार? हे येणाऱ्या कालखंडात समजणारच आहे. यापुर्वीचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी बदलीपूर्वी अवैध धंद्यांविरोधात धडक मोहिम राबवून अनेक ठिकाणी कारवाया केल्या होत्या. त्यामुळे काही काळ अवैध व्यवसायांना लगाम बसल्याचे दिसून आले होते. मात्र त्यांच्या बदलीनंतर पुन्हा एकदा परिस्थिती 'जैसे थे' झाल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे मलठण परिसरातील सोनेसांगवी रोडतगत शेड उभारून मोठ्या प्रमाणावर जुगार अड्डा सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

## राज्यात आजपासून वाजणार शाळेची घंटा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** आज सोमवार १५ जून पासून २०२६ - २७ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ होत असून संपूर्ण राज्यातील शाळेची घंटा वाजणार आहे. प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आजपासून सुरु होत असून शिक्षण विभागाने यासाठी जोरदार तयारी केली आहे. पहिल्याच दिवशी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात येणार आहे. सजवलेल्या बैलगाडीतून शालेय मुलांना फेटे बांधून मिरवणूक काढण्यात येणार आहे, तर काही ठिकाणी पारंपारिक ढोल ताशांच्या गजरात शाळा प्रवेशाचा कार्यक्रम होणार आहे. मुलांना गुलाबपुष्प आणि खाऊ वाटप करून शुभेच्छा देण्यात येणार आहे. अशी माहिती पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी राजकुमार बामणे यांनी दिली. पुरंदर तालुक्यात प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ८३५८ इतकी असून यामध्ये ४२५५ मुलांचा तर ४१०३ मुलींचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके देण्यात येतील, त्याचबरोबर एक गणवेश आणि एक बूट व दोन पायमोजे जोडी देण्यात येतील. गणवेश, बूट, पायमोजे यासाठी शासनाने पूर्वीच शाळेत पैसे जमा केले असून शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने खरेदी करण्यात आली आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी स्वच्छ आणि सुंदर वातावरणात स्वागत व्हावे यासाठी शिक्षकांनी १२ जून रोजी सर्व मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांचे संयुक्त बैठक घेऊन शैक्षणिक वर्षाची सुरुवात भव्य शाळा प्रवेश उत्सवाने साजरा करण्याचे नियोजन करणायत आले आहे. शाळेत पहिले पाऊल टाकणाऱ्या इयत्ता पहिलीतील मुलांचे कुंकवाच्या ताटात पाऊल बुडवून कागदावर ठसे उमटवून 'पहिले पाऊल' हा उपक्रम शाळा मधून साजरा करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे, सर्व विद्यार्थ्यांचे बैलगाड्या अथवा ट्रॅक्टर डरे मिरवणूक काढणे, सर्व मुलांचे गावातील सर्व पालक, माजी विद्यार्थी, सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत यांचे सहकार्य घेऊन मुलांचे पुष्पगुच्छ देऊन व विविध प्रकारचे उपक्रमाडरे स्वागत करण्यात येणार आहे, ५३ अधिकारी व पदाधिकारी म्हणून एकूण तालुक्यातील १५८ शाळांना पहिल्या दिवशी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या आनंद द्विगुणीत करण्यासाठी सहभागी होणार आहेत. पुरंदरचे आमदार विजय शिवतारे, पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे, उपसभापती प्रवीण जगताप त्याचप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी वेगवेगळ्या शाळांना भेटी देवून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत.

# पुण्यात शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

## २८ ते ३१ जानेवारी २०२७ दरम्यान आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात दि. २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. हे संमेलन चार दिवसांचे असून ते ऐतिहासिक आणि भव्य स्वरूपात पार पडेल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी आज (दि. १४) पत्रकार परिषदेत दिली.

संमेलनाचे संयोजक, समर्थ युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, मसापाच्या प्रमुख कार्यवाड डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर उपस्थित होते. महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी पुण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखा याबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. यापूर्वी दि. १३ जून रोजी स्थळ निवड समितीने एस. पी. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठ परिसराची पाहणी केली होती.

या पाहणीमध्ये योगेश सोमण, उपाध्यक्ष पुरुषोत्तम सप्रे, कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, डॉ. रामचंद्र काळुंखे, प्रा. प्रतिभा सराफ आणि लखनसिंह कटरे सहभागी झाले होते.

बैठकीत विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संमेलनासाठी आवश्यक असलेले भव्य प्रांगण, प्रशस्त पार्किंग व्यवस्था तसेच विद्यापीठातील सुमारे दीड हजार प्राध्यापक व कर्मचारी संमेलनाच्या यशासाठी सहकार्य करतील, अशी ग्वाही कुलगुरू सुरेश गोसावी यांनी दिल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

या सर्व बाबींचा विचार करून शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. रविवारी झालेल्या बैठकीस ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्यासह महामंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते.

नांदी शंभराव्या साहित्य संमेलानाची या उपक्रमातून पुणे, मुंबई वगळता जेथे साहित्य संमेलने झाली आहेत, अशा महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह महाराष्ट्राच्या विविध भागात संमेलनपूर्व ९९ साहित्यिक उपक्रमांद्वरे शंभराव्या साहित्य संमेलनाची नांदी होणार आहे. १५ ऑगस्ट ते १५ जानेवारी या कालावधीत हे साहित्यिक उपक्रम राबविले जाणार आहेत.

## आठवडे बाजारात विक्रेत्यांशी पोलीस निरीक्षकांचा संवाद

### शिक्रापूर पोलिसांची बाजारातील चोऱ्या रोखण्यासाठी मोहीम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) पोलिस स्टेशन हद्दीमध्ये आठवडे बाजारांमध्ये नागरिकांना मोबाईल व इतर किमती ऐवज चोरीचे प्रमाण मोठे असल्याने पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनचा पदभार घेतात कोरेगाव भीमा येथील आठवडे बाजारात नागरिकांसाठी स्पीकरवर सूचना व विक्रेत्यांशी संवाद साधत येत्या काळात शिक्रापूर, तळेगाव ढमढेरे, कोरेगाव भीमा येथील आठवडे बाजारात विशेष मोहीम आखणार असल्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी सांगितले. शिक्रापूर (ता. शिरुर) पोलिस स्टेशन हद्दीमध्ये आठवडे बाजारांमध्ये होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी शिक्रापूर पोलिसांची विशेष मोहीम आखली असून पोलिसांनी आठवडे बाजारात नागरिकांसह विक्रेत्यांशी संवाद साधला, यावेळी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी व्यापाऱ्यांसह बाजारात येणाऱ्या नागरिकांशी संवाद साधला. यावेळी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक पंडित मांजरे, पोलीस हवालदार श्रावण गुपचे, संदीप कारंडे, गणेश कुदळे, विकास सरोदे, अमोल दांडगे, अजित इंगवले, विकास बांगर, उमेश जायपत्रे, प्रतीक गायकवाड, विकास कारखिले यांसह आदी उपस्थित होते, तर शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत असणाऱ्या शिक्रापूर, कोरेगाव भीमा, तळेगाव ढमढेरे याठिकाणी असणाऱ्या आठवडे बाजारात नागरिकांना चोरट्यांपासून संरक्षण व्हावे यासाठी स्पीकर वर दिवसभर पोलिसां मार्फत सूचना देण्यात येणार असून चोरट्याना शोधण्यासाठी साध्या वेशात पोलीसांचे फिरते पथक व वाहतूक नियमनासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले, यावेळी सरपंच अनिकेत गव्हाणे यांनी आठवडे बाजार वाहतूक नियमणासाठी व बाजारामध्ये विविध उपाय योजना करण्यासाठी ग्रामपंचायत सर्वो तपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.



कोरेगाव भिमा (ता. शिरूर) येथील आठवडे बाजारात विक्रेत्यांशी संवाद साधताना शिक्रापूर पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव.(छायाचित्र आकाश भोरडे)

**आम्ही चोरट्याना पकडून देऊ**

कोरेगाव भिमा आठवडे बाजारात आजपर्यंत व्यापाऱ्यांशी कोणत्याच अधिकाऱ्यांनी संवाद साधला नाही त्यामुळे आमच्यासाठी कौतुकास्पद असून बाजारात येणाऱ्या महिला चोरट्यामुळे नागरिकांना चोरीला सामोरे जावे लागते त्यामुळे त्या महिला चोरट्याना आम्ही पकडून देऊ असे बाजारातील व्यापारी प्रमिला सोनारे यांनी सांगितले, तर पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी प्रमिला सोनारे यांचे कौतुक केले.

## जेजुरीच्या विकासासाठी सेंद्रिय हळद, भक्तनिवास व कॉरिडॉरची गरज : डॉ. नीलम गोऱ्हे

### देवस्थानने भाविकांना मोफत सेंद्रिय हळद उपलब्ध करून देण्याचा विचार करावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** जेजुरी देवस्थानच्या प्रगती आणि विकासासाठी आपण अनेकदा विधानभवनात बैठका घेतल्या असून, श्रद्धेला धक्का न लावता सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. आज जेजुरी येथे डॉ. गोऱ्हे यांनी श्री खंडोबाची विधिवत पूजा करून दर्शन घेतले. खंडोबाने जसा दुष्ट शक्तींचा पराभव केला, तसेच सर्व नागरिकांना संकटांपासून संरक्षण मिळावे आणि महायुती सरकारच्या माध्यमातून जनहिताची कामे अधिक वेगाने पूर्ण होत राहावीत, अशी प्रार्थना त्यांनी श्री खंडोबाच्या चरणी केली. याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त ॲड. विश्वास पानसे यांनी डॉ. गोऱ्हे यांना शाल, श्रीफळ व खंडोबाची प्रतिमा देऊन सत्कार केला. तसेच कोविड काळात घडशी समाजाला केलेल्या मदतीबद्दल घडशी समाजाच्या वतीनेही डॉ. गोऱ्हे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी पत्रकारांसोबत बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, जेजुरीमध्ये पूर्वी अस्तित्वात असलेली मुरळी प्रथा बंद करण्यात मोठ्या प्रमाणात यश आले आहे. धर्म आणि परंपरा यांचा आदर राखत समाजसुधारणा करता येते, हा दृष्टिकोन ठेवून आम्ही काम केले. अनेकदा धर्म सोडल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही, असे म्हटले जाते; मात्र धर्मातील योग्य सुधारणा करूनही समाजाची प्रगती साधता येते. यासाठी सर्व समाजघटकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

जेजुरीतील भंडाऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या हळदीबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. सेंद्रिय हळदीचा वापर वाढविण्यासाठी देवस्थानने पुढाकार घ्यावा आणि भाविकांना मोफत सेंद्रिय हळद उपलब्ध करून देता येईल का, याचा विचार करावा, असे त्यांनी सुचविले. राज्य सरकारच्या सेंद्रिय हळद संशोधन केंद्राच्या माध्यमातून शुद्ध हळद उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करता येतील, असेही त्यांनी सांगितले.

रासायनिक व बनावट हळदीमुळे भाविकांच्या त्वचा आणि डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून, मंदिराच्या ऐतिहासिक दगडी वास्तूलाही त्याचा फटका बसत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शुद्ध आणि सेंद्रिय हळदीचा वापर आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. यासाठी श्री मार्तंड देवसंस्थानला त्यांनी वैयक्तिकरित्या २१ हजार रुपयांची देणगी धनादेश स्वरूपात दिली.

देवस्थानच्या जमिनीचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगत डॉ. गोऱ्हे यांनी जेजुरीच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. जेजुरीला येणाऱ्या लाखो भाविकांसाठी आधुनिक सुविधा असलेले भक्तनिवास उभारण्याची गरज असून, यासाठी स्थानिक नागरिक आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) यांनी संयुक्तपणे पुढाकार घ्यावा, असे त्या म्हणाल्या.

वाराणसीच्या धर्तीवर जेजुरीमध्येही धार्मिक पर्यटनाला चालना देणारा कॉरिडॉर विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र अशा विकासकामांमध्ये स्थानिक नागरिकांचा सहभाग आणि विश्वास महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.
























































जाहिरात संकलन : अशोक दुशिंग, शिर्डी